# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## भिवंडी जि- ठाणे.

## -: जाहिर नोटीस :-

**विषय:-महानगरपालिका हददीत असणाऱ्या पावरलुम कारखान्यात कामगारांकरिता पिण्याची पाण्याची व सडांस मुतारीची व्यवस्था करणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये भिवंडी शहरातील सर्व आस्थापना धारकांना कळविण्यात येते की, आपले यंत्रमांग (लुमकारखाना)तसेच अन्य आस्थापना व्यवसाय चालु आहेत. परंतु कारखान्यात /आस्थापनेत काम करणारे कामगार यांना पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने आजुबाजुच्या हॉटेलवर जाऊन पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे कामगारांना अनेक आजारांना समोर जावे लागते.त्याच प्रमाणे कारखान्यात /आस्थापनेत शौचालयाची व्यवस्था नसल्याने कामगारांना उघडयावर शौचालयात जावे लागते.त्यामुळे शहरात दुर्गंधीचे वातावरण पसरुन सार्वजनीक आरोग्य धोक्यात येवून उपद्रव होत असल्याचे दिसून येते.सदर बाब ही सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणास हानीकारक आहे. तरी सर्व आस्थापनानी सदरची व्यवस्था ४५ दिवसांच्या मुदतीत पुर्ण करुन घ्यावी व त्याबाबतचा पुर्तता अहवाल निम्म स्वाक्षरीकार यांचेकडे सादर करावा.

या बाबत सर्व आस्थापनानी नोंद घेवून कार्यवाही न केल्यास महाराष्ट्र पदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण विभाग यांना कळविण्यात येवून त्यांच्या कडून नियमानुसार होणाऱ्या कारवाईस आपण पात्र रहालं याची गांभिर्य पूर्वक नोंद घ्यावी.

(अरुण निरभवणे)
शहर अभियंता तथा
नियंत्रण अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

o/c